पिंपरी चिंचवड महानगरपालिका
**इ क्षेत्रीय कार्यालय**
कार्यपत्रिका क्रमांक-१
**(सभापती निवडीची सभा)**
सभावृत्तांत

दिनांक **१०/ ०४ /२०१५** वेळ- दुपारी ३:३० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीच्या सभापती निवडीची मासिक सभा शुक्रवार दिनांक **१०/ ०४ /२०१५** रोजी **३.३० वाजता** (मा.महापालिकेचे सभागृह ) महापौर कै.मधुकर रामचंद्र पवळे सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८. येथे मा.श्री.ओमप्रकाश बकोरिया,पिठासन अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे.यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती . सभेस खालील सन्मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.आल्हाट मंदा उत्तम
२. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
३. मा.सुपे आशा रविंद्र
४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५. मा.मोहिनीताई विलास लांडे
६. मा.गोफणे अनुराधा देविदास
७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे- क्षेत्रीय अधिकारी, इ क्षेत्रीय कार्यालय, श्री.श्रीनिवास रा.दांगट-प्रशासन अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त - पुणे महानगरपालिका पीठासीन अधिकारी** – सन्मा.सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. इ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.
**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.**

**मा.प्रशासन अधिकारी तथा- सचिव(सभाशाखा )** मा. इ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण दोन नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर | मा.गोफणे अनुराधा देवीदास | मा.गव्हाणे सुरेखा शंकर |
| २. | मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर | मा.चंद्रकांत(भाऊ) साहेबराव वाळके | मा.सुपे आशा रविंद्र |

-------

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) यांनी प्राप्त झालेले उपरोक्त नामनिर्देशन पत्र पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले आहे. पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.

**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त – महानगरपालिका पीठासीन अधिकारी** इ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात आले आहे. त्यामध्ये इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर या एकच वैधरित्या नामनिर्देशीत उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनीटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पीठासीन अधिकारी यांचेकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(पीठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दुपारी ३.३१ ते ३.४६ हा १५ मिनीटांचा कालावधी दिला.)

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनीटांच्या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी माघारीचा अर्ज दिला नाही.

-------

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -४११०१८

इ प्रभाग समिती

ठराव क्रमांक-१ विषय क्रमांक- १

दिनांक -१०/ ०४ /२०१५ विभाग- इ प्रभाग प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ प्रभाग समिती सभापती पदासाठी निडणूक निवडणूक लढविणा-या मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर या एकच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर यांची इ प्रभाग समितीचे सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करणेत येत आहे.

सही/-
ओमप्रकाश बकोरिया
पिठासन अधिकारी तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र-इक्षेका/४/कावि/ १३८/२०१५
दिनांक-१० /४/२०१५

**सही/-**
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
**( इ क्षेत्रीय कार्यालय)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत –
सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य् त्या कार्यवाहीसाठी रवाना.

त्यानंतर नवनिर्वाचित सभापती मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर यांचे अध्यक्षतेखाली विषयपत्रिकेवरील इतर विषय खालीलप्रमाणे मंजूर करणेत आले.

-------

ठराव क्रमांक- २ विषय क्रमांक- २

दिनांक- १०/४/२०१५ विभाग- इ प्रभाग प्रशासन

सुचक- मा.मोहिनी ताई विलास लांडे अनुमोदक-मा.आल्हाट मंदा उत्तम

संदर्भ - इ प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.

इ प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या बुधवारी दु. ३.०० वा.** ( पहिल्या बुधवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेलतर दुस-या दिवशी) ई क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित सभापती मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर )
सभापती
इ प्रभाग समिती, भोसरी-३९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/४/कावि/१३९/२०१५
दिनांक- १० /४/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
( इ क्षेत्रीय कार्यालय)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत –

सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य् त्या कार्यवाहीसाठी रवाना.